जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID**: crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - दिनांक - ०२७८०/११/२०२३**

भारती विदयापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर

## भारती विद्यापीठ पो स्टे व भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फाईन आर्टस यांच्या संयुक्त विद्यमानाने विधीसंघर्षीत बालकांचे भवितव्यासाठी कार्यशाळा आयोजीत केलेबाबत

पुणे शहरामध्ये बालकांकडुन गंभीर स्वरुपाचे गुन्हे वारंवार घडत असल्यामुळे त्यांना समुपदेशन करुन त्यांना समाजामधील चांगल्या प्रवाहामध्ये आणुन त्यांना घडविण्यासाठी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे व भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फाईन आर्टस यांचे संयुक्त विद्यमानाने दिनांक ३१/१०/२०२३ रोजी भारती विद्यापीठ कला महाविद्यालयाच्या शिल्प विभागात बालकांचे भवितव्यासाठी Enlighting the Future – An Art Workshop for juvenile ही कार्यशाळा आयोजीत केली होती.

सदर कार्यशाळेमध्ये बालकांना कलेच्या शिक्षण क्षेत्रातील असलेले फायदे, संधी, तसेच बालकांनी गुन्हेगारीपासुन दुर रहावे,त्यांनी समाजात चांगले नाव कमवावे त्याकरता त्यांना एखादया व्यवसाय अथवा कला शिकुन त्यांनी चांगले नागरीक व्हावे यादृष्टीने त्यांना पणती रंगवुन त्यावरती डिझाईन रंगवण्याचे प्रात्याक्षीक दाखवुन त्यांचेकडुन पणत्या तयार करवुन घेतल्या आहेत. त्या पणत्या दिवाळी सणा मध्ये भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे प्रदर्शन स्वरुपात ठेवुन त्यांची विक्री केली जाणार आहे. सदर उपक्रमामधुन विधीसंघर्षीत बालकांना व्यसन, गुन्हेगारी पासुन परावृत्त करुन,त्यांना स्वयंरोज गारातुन अर्थिक स्वावलंबी बनवुन त्यांनी आई-वडीलांना हातभार लावुन चांगले नागरीक घडावे हा उद्देश आहे. या उपक्रमास एकुण ४५ विधीसंघर्षीत बालकांनी हजर राहुन कार्यशाळा यशस्वी केली आहे.

सदर कार्यशाळे दरम्यान बालकांना मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२,श्रीमती.स्मार्तना पाटील, वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विजय पुराणिक, श्री.गिरीश दिघावकर, सहा.पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ, पोलीस उप-निरीक्षक,धिरज गुप्ता यांनी तसेच भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फाईन आर्टस कॉलेजचे प्राचार्य डॉ.अनुपमा पाटील यांनी समुपदेशन केले आहे.

सदरचा उपक्रम मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२,श्रीमती.स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगावकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड व भारती विद्यापीठ परीवाराचे अध्यक्ष मा.बाबा शिंदे, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फाईन आर्टस कॉलेजचे प्राचार्य, डॉ.अनुपमा पाटील यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आला आहे.










BHARATI VIDYAPEETH POONA
BHARATI
VIDYAPEETH
PUNE

